दि- ३०/३/२०१५-दै. गोमंतक

# जैविक संपदेचा लाभ स्थानिकांना मिळावा

## खासदार राऊत : दोडामार्गात पर्यावरण परिसंवाद

मये, ता. २९ (वार्ताहर) : मानवी विकासाचे प्रकल्प हाती घेत असताना जैविक संपदा, पर्यावरण, निसर्ग संवर्धन आणि संरक्षण यांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. कळणे येथील खाणीसारख्या प्रकल्पाने गावातील परिसरातील जलस्रोतांचे उच्चाटन आरंभले आहे. स्थानिकांना परिसरातील जैविक संपदेच्या घटकांचा लाभ मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन खासदार विनायक राऊत यांनी केले. दोडामार्ग येथील नवनिर्माण महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे आयोजित पश्चिम घाट जागतिक वारसा स्थळ पर्यावरण आणि विकास या पर्यावरणाच्या राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पश्चिम घाटाच्या संरक्षणासंदर्भात शासनाने आणि त्या परिसरातील लोकांनी ठोस भूमिका घेतली नाही. गृहबांधणीसाठी रेती, चिरे त्याचप्रमाणे अन्य घटकांचा स्थानिकांना वापर करायला मुभा दिली. त्यामुळे स्थानिकांना विश्वासात घेऊन पर्यावरण संवेदनशीलतेचे नियम लागू केले पाहिजेत, असे ते म्हणाले. डॉ. हेमंत पेडणेकर यांनी कोकण, गोवा आणि परिसरातील पश्चिम घाटाच्या क्षेत्राला रस्ते, रेल्वे, खनिज उत्खनन आणि विकासाच्या नानाविध प्रकल्पांनी प्रतिकूलता निर्माण केल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. व्ही.ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर यांनी गोवा-महाराष्ट्र आणि सह्याद्री येथील पश्चिम घाटातील नैसर्गिक व वारसा संदर्भात मार्गदर्शन केले.